तिवसा शहरामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३९५/नवि-१८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ एप्रिल, २०२६.

**संदर्भ :-** १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२८८/नवि-२०, दि.०४.०१.२०१६.
२) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र-कक्ष-२०/नविशा/कर व प्रशा/ आस्था/ कावि/४२/२०२६, दि.२७.०१.२०२६.

**प्रस्तावना :-**

तिवसा नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्यास मा. पालकमंत्री, अमरावती यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक २४.०१.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. या अनुषंगाने दिनांक २७.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, तिवसा शहरातील मौजा तिवसा भाग-१ येथील सर्व्हे नं. २८६/१/२७ न.प., वार्ड क्रमांक ०५, मालमत्ता क्रमांक ९०३ मधील ३१३१.१६ चौ. फू. खुल्या जागेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या कामास मान्यता प्रदान करुन रुपये १,९९,७९,५५०/- इतका निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

तिवसा शहरातील मौजा तिवसा भाग-१, जि. अमरावती येथील सर्व्हे नं. २८६/१/२७ न.प. वार्ड क्रमांक ०५, मालमत्ता क्रमांक ९०३ मधील ३१३१.१६ चौ. फू. खुल्या जागेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या रुपये १,९९,७९,५५०/- इतक्या रकमेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | कामाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक स्मारक बांधकामासाठी स्थापत्य खर्च | रु.१,३२,६६,२६०/- |
| २ | बांधकामात वापरण्यात येणारे गौण खनिज रक्कम | रु.१,८५,७११/- |
| ३ | बांधकाम साहित्य तपासणी शुल्क | रु. २२,०३५/- |
| ४ | जी.एस.टी. रक्कम | रु.२३,८७,९२७/- |
| ५ | कामगार विमा खर्च रक्कम | रु.१,३२,६६३/- |
| ६ | विद्युतीकरण खर्च | रु.१५,९१,९५१/- |
| ७ | सिंचन व प्लबिंग खर्च | रु.१,३२,६६३/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | सीसीटीव्ही संच बसविणे खर्च | रु.३,००,०००/- |
| ९ | सौर ऊर्जा विद्युत संच खर्च | रु.७,००,०००/- |
| १० | आकस्मिकता निधी | रु.६,६३,३१३/- |
| ११ | वास्तुविशारद/शिल्पकार/लँडस्केपिंग/सुशोभीकरण शुल्क | रु.५,९६,९८२/- |
| | **एकूण** | रु.**१,९९,७९,५५०/-** |

०२. सदर स्मारक उभारतांना संदर्भाधिन क्र.०१ मधील दि.०४.०१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. सदर अटी व शर्ती पूर्ण होण्याची दक्षता जिल्हाधिकारी, अमरावती यांनी घ्यावी.

०३. सदर स्मारकाच्या अनुषंगाने करावयाच्या कामांची "कार्यान्वयन यंत्रणा" म्हणून तिवसा नगरपंचायतीस घोषित करण्यात येत आहे.

०४. प्रस्तावित कामे विहीत कालावधीत पूर्ण घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, अमरावती यांची राहील.

०५. सदर स्मारकाचे पूर्ण झाल्यानंतर त्याची आवश्यक देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

०६. या कामाकरीता मंजूर करण्यात आलेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेस वितरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच, जिल्हा सह आयुक्त, नगर प्रशासन शाखा, अमरावती यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०७. यासंबंधीचा खर्च मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (८३) नागरी भागात स्मारके उभारण्यासाठी महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान, ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर), (२२१७ A ०३८) या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४१७१६०८४५६२२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA VENKTESH JEWLIKAR

Digitally signed by ANIRUDDHA VENKTESH JEWLIKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=29C6C42B5811A121A201ECD7ACEAAC3251C7D1DED31FF1B6E1A88D86B600C6BD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B986D51C7C29938C2BBB53D563F07DFC61C84B730CB9118407ECAB6A27C67C4C, cn=ANIRUDDHA VENKTESH JEWLIKAR
Date: 2026.04.17 16:10:31 +05'30'

**(अनिरुध्द व्यं. जेवळीकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) विभागीय आयुक्त, अमरावती.

६) जिल्हाधिकारी, अमरावती.

७) उप सचिव (नवि-२०), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

९) मुख्याधिकारी, तिवसा नगरपंचायत, जि. अमरावती.

१०) निवडनस्ती (नवि-१८)